N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** हिंगोली **P.S.(ठाणे):** सेनगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0140 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**15/04/2025 21:50

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 15/04/2025

**Time Period (कालावधी):** पंहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/04/2025

**Time From (वेळेपासून):** 14:18 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 14:41 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 15/04/2025 **Time (वेळ):** 21:38 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 027

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 15/04/2025 21:38 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 01 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** लोकसेवक जाधव ग्रामसेवक,यांचे खाजगी रूममध्ये, दत्तनगर सेनगाव ता सेनगाव ,जि हिंगोली

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अंकोश विठ्ठलराव पौळे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1995

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अडोळ,सेनगांव,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अडोळ,सेनगांव,हिंगोली,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9527666128

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | मोहन गणपत जाधव | | | 1. हिरडव रोड कन्हैया नगर लोणार,लोणार ,बुलढाणा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली
दिनांक:- 15.04.2025

फिर्याद

मी, अंकोश विठ्ठलराव पोले वय 30 वर्ष व्यवसाय - शेती, रा.अडोळ ता.सेनगाव जि.हिंगोली.
मो.नं. 9527666128

समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी दि.02.04.2025 रोजी दुपारी 01.30 वा. चे सुमारास अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे श्री प्रफुल्ल अंकुशकर पोलीस निरीक्षक, यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की, मी मौजे अडोळ ग्राम पंचायतचा सदस्य आहे तसेच मी शेती व्यवसाय करून कुटुंबाची उपजिवीका भागवितो.मला महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सन 2019-2020 अंतर्गत अहिल्याबाई होळकर सिंचन योजनेतुन विहीर मंजुर झाली होती. या विहीर बांधकामाकरीता मला सदर योजनेअंतर्गत 2,99,000/-रूपये मंजुर झाले होते. त्याप्रमाणे सदर विहीरीचे बांधकाम पुर्ण केलेले असुन आजपर्यंत मला 2,01,924/-रूपये रक्कम अदा करण्यात आले असुन कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे तसेच माझे चुलत काका पतींगराव त्र्यंबकराव पोले यांचे जनावराच्या गोठ्याचे शेडचे काम पुर्ण झालेले असुन त्यांचे देखील कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) येणे बाकी आहे. माझे दुसरे चुलत काका उत्तमराव लक्ष्मणराव पोले यांचे यापुर्वी ग्रामसेवक जाधव यांचेकडे दाखल केलेल्या घरकुलाचे प्रस्तावावर ग्रामसेवक यांची सही करून घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती, सेनगाव येथे पाठविणे बाकी आहे.

माझे कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) बिलावर सही करण्याकरीता, चुलत काका पतींगराव त्र्यंबकराव पोले यांचे जनावराच्या गोठ्याचे शेडच्या कुशलचे बिल (शेवटचा हप्ता) बिलावर सही करून घेण्याकरीता आणि दुसरे चुलत काका उत्तमराव लक्ष्मणराव पोले यांचे घरकुलाचे प्रस्तावावर सही करून घरकुलाचा प्रस्ताव पंचायत समिती, सेनगाव येथे पाठविणे असल्याने मी दिनांक 02.04.2025 रोजी आमचे गावचे ग्रामसेवक जाधव यांचेकडे गेलो होतो. तेव्हा मी त्यांना भेटुन माझे सिचंन विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेल्या कुशलचे बिलावर, चुलत काका पतींगराव पोले यांचे गोठयाचे शेडचे कुशलचे बिलावर व दुसरे चुलत काका उत्तमराव पोले यांचे घरकुलाचे प्रस्तावावर सह्या करण्यासाठी विनंती केली तेव्हा ग्रामसेवक जाधव हे मला म्हणाले की, तुम्ही तुमचे व तुमच्या काकाचे कुशलच्या बिलाचे प्रत्येकी तिन हजार रूपये व तुमच्या काकाच्या घरकुलाच्या प्रस्तावाचे दोन हजार रूपये असे एकुण 8,000/- रू मला आणुन द्या तरच मी तुमचे व तुमच्या काकाच्या कुशलच्या बिलावर व तुमच्या दुसऱ्या चुलत काकाच्या घरकुलाच्या प्रस्तावावर सह्या करतो असे म्हणुन मला 8,000/- रू. लाचेची मागणी केली असुन त्यांचे विरूध्द कायदेशीर कार्यवाही करावी अशी लेखी तक्रार दिली होती.

त्यांनतर पो.नि.श्री. प्रफुल्ल अंकुशकर, ला.प्र.वि हिंगोली यांनी दोन शासकीय पंचाना ला.प्र.वि. कार्यालयात बोलावुन माझा परीचय त्यांना व त्यांचा परीचय मला करून दिला, हजर असलेले दोन पंच नामे श्री विनोद शिंदे, कृषी सहायक, तालुका कृशी अधिकारी कार्यालय, हिंगोली व श्री विजय पवार, कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, हिंगोली असे बोलविले असुन त्यांना मी दिलेली लेखी तक्रार दाखविण्यात आली होती. त्यानंतर मी दिलेल्या तक्रारीच्या संबंधाने दिनांक 02.04.2025 रोजी तक्रार पडताळणी कार्यवाही करण्याकरीता पंच क्र.01 शिंदे यांचेसह मोहन जाधव, ग्रामसेवक यांची सेनगाव येथील खाजगी रूमवर भेट घेण्याकरीता गेलो असता त्यांची सेनगाव येथील रूमवर भेट झाली तेव्हा माझे सिंचन विहीरीचे कामासंबधी बोलणी केली असता माझे सिचंन विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेल्या कुशलचे बिलावर व चुलत काका पतींगराव त्र्यंबकराव पोले यांचे गोठयाचे शेडचे कुशलचे बिलावर सहया करण्यासाठी तडजोडीअंती दोघांत 3,000/- रूपये व माझे दुसरे चुलत काका उत्तमराव लक्ष्मणराव पोले यांचे घरकुलाचे प्रस्तावावर सही करून प्रस्ताव पंचायत समिती, सेनगाव येथे पाठविणे करीता 2,000/- रूपये

असे एकुण 5,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याची सहमती दिली होती.
त्यावरून दिनांक 15.04.2025 रोजी पो.नि.श्री. प्रफुल्ल अंकुशकर ला.प्र.वि हिंगोली यांनी सेनगाव जिंतुर रोडवरील गणपती मंदीर येथे शासकीय वाहनात सापळापुर्व कार्यवाही विजय पवार, कृषी सहाय्यक व गणेश इंगळे, कृषी सेवक या पंचासमक्ष करून दाखविली त्यानंतर मी लाच म्हणून देण्यासाठी आणलेले 5,000/- रू. (ज्यात 500/- रू. चे 10 नोटा) चे नंबर व वर्णन एका कागदावर टंकलिखित करण्यात आले होते. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुषकर यांनी अँन्थ्राँन्सीन पावडर व अँल्ट्राव्हायलेट लॅम्प बाबत माहिती देवून त्याचे प्रात्यक्षिक पोह/शेख अकबर, लाप्रवि हिंगोली यांचे करवी करून दाखविले व लाच म्हणुन दयावयाच्या नोटांना दोन्ही बाजुने अँन्थ्राँन्सीन पावडर लावली व लोकसेवक मोहन जाधव, ग्रामसेवक यांनी माझेकडुन लाच स्विकारल्या नंतर माझे गळयातील मोठा रूमाल काढुन हातात धरावा असा ईशारा करावयाचा असल्याचे पोलीस निरीक्षक श्री प्रफुल्ल अंकुशकर यांनी मला पंचाना व सापळा पथकातील सर्व सदस्यांना सुचना दिली.
त्यानंतर दिनांक 15.04.2025 चे दुपारी 02.18 वा. दरम्यान मी व सोबत पंच विजय पवार असे माझे मोटार सायकलवर, मोहन जाधव, ग्रामसेवक यांना भेटण्यासाठी सेनगाव ते जिंतुर रोड येथील गणपती मंदीर येथुन जाधव, ग्रामसेवक यांचे सेनगाव येथील खाजगी रूमकडे रवाना झालो. आमचे पाठोपाठ सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी शासकीय वाहनासह आले. त्यांनी त्यांचे वाहण सेनगाव येथील, सेनगाव ते रिसोड रोडवर थांबवुन शासकीय वाहनातुन उतरून पायी चालत-चालत आले व मोटार सायकल वरील दोन कर्मचारी आमचे मोटार सायकलचे मागे-मागे आले. माझी व मोहन जाधव, ग्रामसेवक यांची पंचासमक्ष सेनगाव येथील त्यांचे खाजगी रूमवर भेट झाली. त्यादरम्यान माझ्यात आणि त्यांच्यात कुशलचे कामासंबंधाने बोलणी झाली त्यादरम्यान मोहन जाधव, ग्रामसेवक यांनी पेमेंट आणले का विचारले असता, मी हो म्हणालो व माझे पॅन्टचे पाठीमागील डाव्या बाजुचे खिशातील लाचेची रक्कम 5,000/-रू. काढुन त्यांचे समोर धरली व म्हणालो की, एमब्याचे दोन्हीचे तीन आण त्याफाईलचे दोन हजार म्हणालो असता जाधव, ग्रामसेवक यांनी बरोबर हयंत न..... पाच हयतन असे म्हणाले असता, मी पहानं तुम्ही असे म्हणालो असता, तेथे हजर असलेला माझा चुलत मेव्हणा बबन कुंदर्गे रा. कवरदडी याचेकडे पैसे देण्यास सांगीतले असता त्यांनी माझेकडुन पैसे घेतले नाही म्हणुन ग्रामसेवक जाधव यांनी त्यांचे पाठीमागे असलेल्या भिंतीच्या फरताळावर वर ठेवा... वर ठेवा असे म्हणाले वरून मी सदर लाचेची रक्कम 5,000 /- रू फरताळावर ठेवुन रूमच्या बाहेर येवुन सापळा पथकास ठरल्याप्रमाणे लाच स्विकारल्याचा इशारा केला. तेव्हा सापळा पथकाने मोहन जाधव, ग्रामसेवक यांना दुपारी 02.41 वाजताचे सुमारास दत्तनगर, सेनगाव येथील त्यांचे, खाजगी रूममध्ये येवुन त्यांना ताब्यात घेतले. ग्रामसेवक जाधव यांचे पाठीमागे असलेल्या भिंतीच्या फरताळावर ठेवलेली लाचेची रक्कम 5,000/-रू. पंचासमक्ष जप्त केली. तसेच पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान माझे व मोहन जाधव, ग्रामसेवक, ग्रामपंचायत आडोळ यांचेशी प्रत्यक्ष भेटीदरम्यान झालेले संभाषण हे व्हाईस रेकॉर्डरद्वारे मेमरीकार्डमधे रेकॉर्ड करण्यात आले आहे.
तरी आमचे आडोळ गावातील ग्रामसेवक मोहन गणपत जाधव यांनी माझे सिंचन विहीरीचे बांधकाम पुर्ण झालेल्या कुशलचे बिलावर व चुलत काका पतींगराव पोले यांचे गोठयाचे शेडचे कुशलच्या बिलावर सह्या करण्यासाठी दोघांत 3,000/- रूपये व माझे दुसरे चुलत काका उत्तमराव पोले यांचे घरकुलाचे प्रस्तावावर सही करून प्रस्ताव पंचायत समिती, सेनगाव येथे पाठविणे करीता 2,000/- रूपये असे एकुण 5,000/- रूपये लाचेची मागणी करून सदर 5,000/- रू लाचेची रक्कम त्यांचे खाजगी रूम मधील फरताळावर ठेवण्यास सांगुन सदर लाच रक्कम स्विकारली म्हणुन त्यांचे विरूध्द योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणुन मी फिर्याद देत आहे.
माझी वरील फिर्याद मी सापळा कार्यवाही झाल्यानंतर ला.प्र.वि. कार्यालय हिंगोली येथे तोंडी सांगितली असुन ती संगणकावर टंकलिखित केली. माझे वरील फिर्यादीची प्रींट काढल्यावर मी माझी फिर्याद वाचुन पाहिली असून ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष

सही

(प्रफुल्ल अंकुशकर)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग हिंगोली .

अंकोश विठ्ठलराव पोले
रा.आडोळ ता.सेनगाव, जि. हिंगोली

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
PRAFULL HANUMANTRAO ANKUSHKAR
**Rank (पद):** I (Inspector) **No.(क्र.):** PI
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District (जिल्हा):**
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** Shalini Deorao Naik
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** PI

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, सेनगांव